# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १७/०३/२०२३

➢ दुखापत :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ३६१/२०२३ कलम ३२४,५०४ ,३४ भादवि | अमरावती | दि १६-०३-२३ चे ०९-०० वा दरम्यान<br>दि १६-०३-२३ चे १७-२५ वा. | एक महिला | संजय भाउराव बनसोड रा संत गुलाबबाबा नगर अमरावती<br>२ ) एक महिला | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे शेजारी राहणारे आरोपी हे नेहमी कारण नसतांना विनाकारण वाद करतात व भांडण करतात. दि १६-०३-२३ चे सकाळी ०९-०० वा दरम्यान फिर्यादी हे त्यांचे घरी अंगणात झाडु मारीत असतांना त्यावेळी त्यादरम्यान आरोपी हा सुद्धा तेथे हजर होता. तेव्हा त्याची पत्नी हि सुद्धा तेथे आली व इथे काच कुणी टाकली या कारणावरुन वाद करुन तिथे असलेली विट मारली व फि चे डोक्याला मार लागला व जख्म होवुन रक्त निघाले व फिर्यादी हे डोक्याला मार लागल्याने खाली पडले त्यावेळी फि चे पती हे भांडण न करण्याकरीता समजुत काढत असतांना फि चे पती ला आरोपीने मारहाण करुन शिविगाळ केली ,लगेच फि चे पती हे पो स्टे ला .येवुन तक्रार दिली. अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र ३६२/२३ कलम ३२४,३४१ , ३४,२७९ भादवि | इर्विन चौक बाबासाहेब पुतळ्याजवळ अमरावती | दि १६-०३-२३ चे १५-३० वा दरम्यान<br>दि १६-०३-२३ चे १९-१९ वा | अपहाज खान युसुफ खान वय30 वर्षे रा अबुबकर कॉलनी धरमताटा अमरावती | २ अज्ञात इसम | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फि हे मिस्त्री काम करुन निघाले असता पंटवटी चौकात सिग्नलवर उभे असतांना दोन इसम हे वाकडे तिकडे वाहन चालवित होते तसेच ते पुढे इर्विन चौक येथे निघाले असता तेथील सिग्नल वर त्यांनी अज्ञात इसमाला फिर्यादी यांनी महटले कि तु वाकडी तिकडी गाडी चालवित आहे आम्हाला लागले असते तर त्यांनी असे म्हटल्यावरुन ते मो सा चे खाली उतरले व आरोपीस मारहान करु लागले तसेच फिर्यादी यांचा मित्र सलमान खान हे सोबत असतांना त्यांनी त्याचे मित्राला सुद्धा मारहान केली त्यावरुन फिर्यादील किरकोळ मार लागला हे पाहताच लोकांनी फिर्यादीस ऑटोत बसवुन पाठवुन दिले व फीर्यादीचा मित्र हा त्याची गाडी लोटत लोटत खापर्डे बगीचा येथे गेले हे पाहताच आरोपीने पाठलाग केला व फिर्यादीस प्रीया टॉकीज येथे ऑटो थांबवुन पुन्हा फायटरने मारहान केली व फि हे पो स्टे सिटी कोतवाली येथे तक्रार देण्यास गेले असता त्यांनी फि चे मेडीकल करुन आणले तेव्हा पो स्टे सिटी कोतवाली येथे फिर्यादीचा सोबत असलेला मित्र सलमान खान हा आला व म्हणाला कि आपली तिथे लावलेली गाडी क्र MH २७ DD १५८० हि दिसुन आली नाही .सदर घटनास्थळ हे पो स्टे गाडगे नगर मधील असल्याने सदर फिर्यादीची मेडीकल तपासणी करुन पो स्टे सिटी कोतवाली येथुन पो स्टे गाडगे नगर येथे पाठविण्यात आले .अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ७ | १० |
| १. | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. १०४/२०२३ कलम ३५४, ३२३,५०४, ३४ भादवी | दि. १६/०३/२०२३ चे १९.३० वा. दा. ता. वेऴ दि. १६/०३/२०२३ चे २१.१० वा | १) संतोष हिरकणे रा. ज्ञानेश्वर लेआऊट मालु इंटरनँशनल कॉलेज च्या मागे शेगाव रहाटगाव रोड अमरावती २) एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की, मी समक्ष पोस्टे. ला हजर येवुन जबानी रिपोर्ट देते की मी वरील ठिकाणी भाड्याने राहते मी चार महिण्यापुर्वी पासुन ३०००/रु महिण्या प्रमाणे भाड्याने राहत आहे. माझे घरमालक आता मला घर खाली करुन मागत आहे. दि. १५/०३/२३ रोजी दुपारी ०४/०० वा. घरमालक व मालकीन यांनी मला तु रुम खाली कर असे म्हणुन मला शिवीगाऴ व भांडण केले होते त्याचा रिपोर्ट मी पोलीस स्टेशन ला दिला होता. काल मी अर्धे सामान नेले होते. आज दि. १६/०३/२०२३ चे १९/३० वा. चे दरम्याण माझे राहीलेले सामान व भांडे घेण्यास माझे सोबत एक महिला असे गेले असता घरमालक संतोष हिरकणे यांनी मला माझ्या खोली मध्ये राहीलेले भांडे सामान घेण्यास जाऊ दिले नाही.व त्यामध्ये संतोष हिरकणे हे माझे अंगावर येवु त्यांनी माझ्या अंगावरील सलवार कुर्ती फाडली व माझा विनयभंग केला तसेच आरोपी क्रमांक ०२ हिने मला शिवीगाऴ केली व त्यांनी मला माझे सामान घेण्यास जाऊ दिले नाही त्यांचेवर कार्यवाही करिता मी पोलीस स्टेशन ला रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पो.स्टे. सायबर, अमरावती शहर अप.क्रं. १२/२०२३ कलम ३५४ अ भादंवि सहकलम ६७ माहिती तंत्रज्ञान कायदा | .घटना ता व वेळ दि.१५/०३/२०२३ चे १५.१५ वा. ते दि.१६/०३/२०२३ चे १०.०० वा. पावेतो माहिती ता.वेळ दिनांक १६/०३/२०२३ चे १४.१० वा. दाखल ता. वेळ दि.१६/०३/२०२३ चे १७.४३ वा. | युआरएल - https://www.facebook.com/profile.php?id=100026669114456 चा धारक | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील घटना ता.वेळी ठिकाणी यातील युआरएल https://www.facebook.com/profile.php?id= 100026669114456 च्या धारकाने फियादीचे फेसबुक वर मॅसेजरव्दारे कॉल केले व फि. चे मॉर्फ केलेले अश्लिल फोटो फिर्यादीस फेसबुक मॅसेजरवर पाठवीले वरुन गुन्हा दाखल. |

➢ वाहन चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्र. २७६//२० २३ कलम ३७९ भादवी | राजापेठ हॉटेल ड्रिम लँड च्या गल्लीत अमरावती | दि. १६/३/२३ चे १२/०० ते १२/१५ वा. दा. ता. वेळ - दि. १६/३/२३ चे १८/३१ वा. | नंदकुमार मनोरराव तांबलकर वय ५२ वर्ष रा रविनगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे हॉटेल ड्रिम लँड च्या जवळील देशी दारु दुकानात दारु पिण्याकरीता त्याची हीरो होंडा स्पेल्डर क्र एम एच २७ एएच ०६७२ इंजिन HA10EA9HB14860 क्र चेचिस क्र MBLH१० EE९HB१४७८० कि अं ३०,००० रु कि अं ३०,००० रु ची घेवुन गेला असता दुचाकी गल्लीमध्ये लावुन दारु पिउन परत आल्यावर फिर्यादीची दुचाकी दिसुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ स्त्रिअत्याचार :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ७ | १० |
| १ | पोस्टे वलगाव १०२/२०२ ३ कलम ३७६ ३७६D. ३९२, ३२३, ५०६, ३४ भादवि. | दि.१५/०३/२०२ ३ चे २२/३० वा. माहीती. दि.१६/०३/२०२३ चे १६/०० वा. दाखल दि.१६/०३/२०२३ चे १६/५५ वा. | १) सचिन मिलीनंदराव उगले वय ३० वर्ष रा.केशरवानी ले आउट वलगाव ता.जि.अमरावती. २) अनिरुध्द शेषराव उगले वय ३५ वष रा.सिध्दार्थ नगर वलगाव ता.जि.अमरावती. | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादी ही केटरींग च्या कामाला मजुरीने ग्राम नया अकोला येथील शिवदास चव्हान यांचे सोबत कामाला जाते. नमुद घटना ता.वेळी व ठीकानी फिर्यादी ही शिवदास चव्हाण यांचे सोबत त्यांना जाण्या करीता वाहण नसल्याने जेवण करुन नागोबा मंदिराचे मागे आराम करीत असतांना यातील आरोपि क्र.०१ व ०२ त्या ठीकानी आले. त्यानी तुम्ही इथे काय करीत आहे. तुमचा व्हिडीओ काढुन सगळीकडे पाठवितो व तुमची बदनामी करतो. असे म्हणुन त्यांचे मोबाईल मध्ये व्हिडीओ काढु लागला. तेव्हा तेथील आरोपि क्र.०२ यांने शिवदास यांना बुक्यानी मारहान करुन बाजुला नेले. आरोपि क्र.०१ यांने फिर्यादीची साडी सोडुन बळजबरीने फिर्यादी सोबत लैंगिक संभोग केला.व फि.चे पर्स मधिल नगदि ३,०००/रु बळजबरीने हिसकावुन घेतले. फिर्यादी घाबरलेली असल्ाने विरोध केला नाही. फिर्यादी सोबत जबरीने संभोग केल्या नंतर आरोपि क्र.०१ तेथुन निघुन गेला. काही वेळाने आरोपि क्र.०१ व ०२ हे शिवदास यांना हाताने मारहान करुन त्यांचे खिशातील १,०००/रु बळजबरीने हिसकावुन घेतले.त्यानंतर आम्ही तुमच्या सोबत काय केले. हे जर कोणाला सांगितले तर तुम्हाला मारतो अशी धमकी देवुन आरोपि तेथुन गाडीने निघुन गेले. आम्ही दोघेही खुप घाबरलो होतो.त्यामुळे रात्र भर वलगाव बस डेपो मध्ये थांबलो. त्यानी धमकी दिल्या मुळे आम्ही घाबरलेलो होतो.त्यामुळे काल रिपोर्ट दिला नाही.आज रोजी .हिम्मत करुन पोलीस स्टेशन वलगाव येते रिपोर्ट देण्या करीता आलो.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

➢ **विश्वासघात (फसवणुक) :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ३. | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप नं २१०/२०२३ कलम ४२०, ४६६ भादवी | आदर्श नेहरु नगर कॉग्रेस नगर रोड अमरावती | दि ०२/०७/२०२१ चे ११/०० वा.<br><br>दि १६/०३/२०२३ चे १९/१४ वा | ब्रम्हानंद दादारावजी भटकर वय ५२ वर्ष धंदा — खाजगी व्यवसाय रा आदर्श नेहरु नगर कॉग्रेस नगर रोड अमरावती | १.रावसाहेब वाहाणे २. किशोर भाटी | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे वर नमुद दोन्ही आरोपींना ओळखतात जुन २०२१ मधे फिर्यादीचे घरी आले व तुमच्या मुलांना महानगर पालीकेत कंत्राटी बेसवर क्लर्क म्हणुन नोकरी लावुन देतो असे सांगीतले त्याकरीता प्रत्येकी ५०,०००/— रु. लागतील व आणखी कोणी कॅडीडेट असतील तर सांगा असे म्हटले नमुद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी हे पैसे घेण्यासाठी फिर्यादीकडे आले व फिर्यादीने सुध्दा त्यांच्यावर विश्वास ठेवुन त्याच्या दोन्ही मुलांचे ४० हजार रूपये व त्यांच्या बहीण हीने तीच्या एका मुलाचे २५,०००/— असे एकुण ६५,०००/— नगदी वर नमुद आरोपी यांना दिले सदर घटनेचा व्हीडीओ रेर्कॉडींग देखील केली. कॉपी फिर्यादीला आणुन दीली व जुलै किंवा ऑगष्ट महीन्यात मुलांना कामावर लावुन देतो म्हणुन सांगीतले. जेव्हा पण फिर्यादी दोघांजवळ चौकशी करायचे दोघेही टाळाटाळ केली. वर्षाचा कालावधी गेल्यावर फि ने पोलीस स्टेशनला जानेवारी २०२२ मधे तक्रार देतो असे सांगीतल्यावर आरोपी क्रं १ याने ॲक्सीस बॅकेचा चेक ६५,०००/— रु. चा दि २१/०३/२०२३ रोजी देवुन तुमचे पैसे परत करत असल्याचे सांगीतले परंतु सदरचा चेक हा चुकीचा आहे असे फि ने आरोपींचे निर्दशनास आणुन दिले तेंव्हा दि २५/०३/२०२३ रोजी परत ॲक्सीस बॅकेचा चेक दिला परंतु सदर खात्यावर पैसेच नव्हते त्या नंतर फिर्यादीने नमुद आरोपीतांना ब—याचवेळा पैसे परत करण्या विषयी अथवा नोकरी लावुन देण्याबाबत तगादा लावला परंतु अदयाप पावेतो उडवाउडवीचे उत्तरे दिली अशा प्रकारे मुलांना नोकरी लावुन देतो म्हणुन फिर्यादीची फसवणुक केली अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४. | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र ३६३/२३ कलम ४०८ | कृषि उत्पन्न बाजार समिती )अमरावती | दि १८-०४-२०२२ चे १६-०२-२३ पावेतो. दातावेळ १६.०३.२०२३ चे २१.३२ | एक महिला | राहुल रविन्द्र सातपुते वय अंदाजे ४२ वर्षे रा द्वारा ज्योती कडुन रॉयल हॉटेच्या बाजुला राधा नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फीर्यादी याचे वडीलाचे क्रुषी उत्पन्न बाजार समिती येथे अडतचे दुकान होते सदरचे दुकान बिल्डींग ड क्र ४ असून वडील मरण पावल्याने सदर दुकानाचे सर्व काम फीर्यादी व त्यांची बहीण पाहत होती व २०२० मध्ये फी चे बहीणीचे लग्न झाल्याने सदर दुकानाचे कामकाज फीर्यादी यांचे एकटेवर आल्यावर त्यांनी दि. १८.०४.२०२२ रोजी आरोपी यास रोजदारी पगाराने कामावर ठेवले व दि १६.०३.२०२३ रोजी त्याने बिलामध्ये काही गैरप्रकार केल्याचे समजले व नंतर फीर्यादी हीने सदरचे बिले तपासले असता १९.०२.२०२३ रोजी तपासली असता त्याचा बिलामध्ये गैरप्रकार सतत सुरु होता ही गोष्ट त्याला कळताच त्याने त्याचा फोन स्वीचऑफ केला तो परत दुकानावर आला नाही नमुद आरोपी याने एकुण ८ बिलामध्ये घोटाळे केले असून बिलाची एकूण |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भादवि | | वा | | | ९,३३,७१२ इतकी रुपयाची फसवणूक केल्याने सदर फीर्यादीचे लेखी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **अपघात :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्र. २७७/२३ कलम २७९, ३३७ भादवी सहकलम १३४ मोवाका | टाटा पेट्रोलपंप समोर रेणुका लॉंन जवळ बडनेरा रोड अमरावती | दि. १८/११/२२ चे २०/३० वा.<br><br>दा. ता. वेळ - दि. १६/३//२३ चे २३/२९ वा. | एक महिला | अज्ञात<br>एस टी चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की  नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी या्तील फिर्यादी यांचे पती जखमी  हे अँक्टीव्हा गाडी क्र एम एच २४ व्हाय १८१४ ने बडनेरा रेल्वे स्टेशन येथुन कुष्णार्पन काँलनी येथे घरी परत येत असतांना त्यांना पाठीमागुन येणा-या एस टी महामंडळाची लाल एस टी बस चालकाने निष्काळजीपनाने चालवुन फिर्यादीच्या पतीला गाडीला धडक मारुन गंभीर जखमी केले व चालक एस टी बस सह पळुन गेला फिर्यादीचे जखमी पती यांचा दि १८/११/२२ पासुन ते दि १३/२/२३ पर्यत दवाखान्यात इलाज करण्यात आला पोस्टेला रिपोर्ट देण्यास विलंब झाल्याने आज रोजी रिपोर्ट देण्यास हजर आली  अशा फिर्यादीटे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावी शहर अप नं २११/२०२३ कलम ४,२५ आर्म ॲक्ट, सहकलम १३५ महा. पोलीस कायदा | मधुसुदन दुधडेअरी जवळ मोती नगर अमरावती | दि. १६/०३/२०२३ चे १६/३० वा. दि. १६/०३/२०२३ चे १९/५० वा. | सरतर्फे पोहेकॉ योगेश श्रीवास ब नं १०१५ वय ५३ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | सतिष उर्फ पिन्टु गोपाळराव नेवारे वय ३७ वर्ष रा. गोंडपुरा डाबकी रोड अकोला ह.मु. किरण नगर न १ अमरावती आष्टाळकर यांचे राहते घरी भाडयाने | हकिककत अशा प्रकारे आहे कि, नमुद फिर्यादी हे हे पो स्टे चे डीबी पथकात तैनातीस असुन कर्तव्यावर असतांना पोउपनी नरवाडे, पोउपनी आकाश वाठोरे,सा.व डीबी पथकातील स्टाफ पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन मिळालेल्या माहीतीचे आधारे नमुद घटना ता वेळी व ठिकाणी जावुन पाहीले असता नमुद आरोपी हा हातामध्ये उघडे धारदार शस्त्र तलवार घेवुन येणा—या जाणा—या लोकांना तसेच मोहल्ल्यातील लोकांना जोरजोराने आरडा ओरड करीत दहशत निर्माण करतांना मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक धारदार लोखंडी पात्याची तलवार किं अं ३००/— रु. असलेली जप्त करण्यात आली आहे. तसेच त्याने मा. पोलीस आयुक्त सा. यांचे कलम ३७ , १ , ३ महा. पोलीस कायदा अन्वये जारी आदेशाचे उल्लंघन करुन हातामध्ये धारदार उघडे शस्त्र तलवार घेवुन लोकांमध्ये दहशत निर्माण केल्याने त्याचे हे कश्त्य कलम ४,२५ शस्त्र अधीनीयम सहकलम १३५, महा.पो.का. अन्वये होत असल्याने फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे बडनेरा अप.क्र.२०४/२३ कलम १३५(१)(e) ,१३८(१) (b) भा . विद्युत कायदा | वैष्णव देवी मंदीर मंगल कार्यालय व लॉन चांदुर रेल्वे रोड, अमरावती. | घटना ता. वेळ - दि १५.०३.२३ चे १३.१५ वा. माहीती वेळ - दि १६.०३.२३ चे १८.०० वा. दाखल ता. वेळ - दि. १६.०३.२३ चे १८.३४ वा. | मिलिंद पुंडलिकराव मनवरे, वय ५० वर्षे, धंदा -सहा. अभियंता , महावितरण कंपनी, वडाळी वितरण केंद्र, रा. मनकर्णा नगर, अमरावती | राजेंद्र रामलालजी पंजाबी, वय ४५ वर्षे, रा. पोहरा, चांदुर रेल्वे रोड, वैष्णव देवी मंदीर, अमरावती. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील आरोपी यांचे चांदुर रेल्वे रोड वरील वैष्णव देवी मंगल कार्यालय व लॉन वर वीज चोरीची ४,६३,९५०/- रू. रक्कम थकबाकी असुन व आरोपी हे कायमचे वीज पुरवठा खंडीत कनेक्शनचे ग्राहक असुन सुध्दा सदर ठिकाणी आरोपीने दुस-या कनेक्शनवरून अवैधरित्या वीजपुरवठा करून वीज चोरी प्रकरणातील थकीत असलेली ४,६३,९५०/- रू. वसुल होण्यास प्रतिबंध केला. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | 61/2023 कलम 283 भादवि | भातकुली बस स्टॉप | दि. 16.03.2023 चे 14.00 ते 14.30 दाखल दि 16.03.23 चे 15.10 | सरतर्फे ना.पो.काँ लक्ष्मण खंडारे ब न 995 पो स्टे भातकुली. | श्रीक्रुष्ण ज्ञानेश्वर मानकर वय 32 रा सायत मागील गुन्हे अभिलेखावर चेक केले असता मिळुन आले नाही | हकीकत-असा प्रकारे आहे की, आम्ही नापोकाँ लक्ष्मण कंडारे ब न 995 सोबत पोकाँ 989 असे पो स्टे हद्दीत सरकारी वाहनाने पेट्रोलींग करीत असतांना 14.00 ते14.30 वा दरम्यान भातकुली बस स्टॉप आमरोडवर वाहन क्रमांक एमएच 30- एफ ओ -0387 चे चालकाने आपले ताब्यातील तीन चाकी ऑटो हे वाहन रहदारीस अडथळा निर्माण होईल व मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे करुन मिळुन आल्याने सदरचागुन्हा दाखल |

➢ **अकस्मात मृत्यु :-**

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर मर्ग क्रं १५/२०२३ कलम १७४ जाफौ | गजानन नगर अमरावती | अतुल गणेश पवार वय ३२ वर्ष रा रा गजानन नगर अमरावती | गोपाल जानराव सोळंके वय ५२ वर्ष धंदा. चालक रा गवळीपुरा अमरावती | गळफास घेवुन आत्महत्या | हकित अशा प्रकारे आहे कि, यातील फिय्रादी यांनी आज दि १६/०३/२०२३ रोजी पो स्टे ला येवुन जबानि रिर्पोट दिला कि,` त्यांचा साळा नामे मृतक अतुल गणेश पवार हा नेहमी दारु पिण्याचे सवयीचा होता तयाने दि १६/०३/२०२३ रोजी दुपारी १३/३० वा. दरमयान फिर्यादीला फोन आला व धनराज सोळंके याने माहीती दिली कि, अतुल याने गळफास घेतला आहे व ेजारच्या लोकांनी त्याच्यामधे जवि आहे असे वाटले म्हणुन ईविन दवाखाना येथे घेवुन गेले असता डॉ सा यांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले वरुन पो स्टे ला रिपोर्ट देण्या करीता आलोण टशा फिर्यादी चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल. |